# वाळूची अवैध वाहतूक करणारा हायवा अर्धापूर पोलीसांनी पकडला

## गुन्हा दाखल; १० लाख १२ हजार रुपयांचा ऐवज जप्त



**अर्धापूर –** अवैधरित्या वाळू वाहतूक होत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक मस्के यांच्या पथकाला मिळाली. त्यानुसार गुरुवारी दि.२३ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री सत्यगणपती मंदिराजवळ अर्धापूर पोलिसांनी अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा हायवा ट्रक ताब्यात घेवून गुन्हा दाखल केला आहे.

अर्धापूर तालुक्यात गेल्या अनेक दिवसांपासून अवैधरित्या वाळू वाहतूक होत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी समोरून व पाठीमागून नंबर प्लेट नसलेल्या हायवा (एम. एच ४३ १३४०) मध्ये अंदाजे पाच ब्रास वाळू चोरून तिची विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बेकायदेशीररित्या वाहतूक करत असताना आढळून आला. या प्रकरणी पोलीस नाईक विजय कदम यांच्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात भादवी सहकलम ४८ (७), ४८ (८) व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व सह कलम ५०/७७ मोटार वाहन कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हायवा व त्यातील वाळू असा एकुण १० लाख रुपये १२ हजार रुपयांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे.

या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास माधव पाटील हे करीत आहेत.

दै. सत्यप्रभा दि. 25-11-23

# अवैध वाळूची वाहतूक; चालकावर गुन्हा दाखल

**अर्धापूर दि.२४ (श. प्र.)**–२३ रोजी सत्यगणपती मंदिर जवळ अर्धापूर पोलिसांनी पकडल्याची घटना घडली.समोरून व पाठीमागून नंबर प्लेट नसलेला हायवा टाटा ट्रक चालक नारायण प्रकाश सोनटक्के वय ३० वर्ष रा. मेंढला ता.अर्धापूर या चालकाने अंदाजे पाच ब्रास रेती (वाळू ) चोरून तिची विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बेकायदेशीररित्या वाहतूक करत असल्या प्रकरणी पो. कॉ विजय कदम यांच्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात भादवी सहकलम ४८(७) , ४८(८) व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व सह कलम ५०/१७७ मोटार वाहन कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हायवा व त्यातील वाळू असा एकुण १० लाख १२ हजार रुपयांच्या एवज पोलीसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास माधव पाटील हे करीत आहेत.